२१ नोव्हेंबर २०२२



॥श्री॥

## – सुभाषित सरिता –

भाषासु मुख्या मधुरा दिव्या गीर्वाण भारती।
तस्यां हि काव्यं मधुरं तस्मादपि सुभाषितम्॥

सर्व भाषांची जननी असणारी संस्कृत भाषा ही देववाणी म्हणून मानली जाते. अतिशय प्राचीन असणारी ही गीर्वाण वाणी अतिशय समृध्द, संपन्न आहे. एका शब्दाला अनेक प्रतिशब्द आहेत. आणि ते त्यातील अनेक छटा दर्शवितात. म्हणजे संख्यात्मक विचार केला किंवा अर्थाच्या दृष्टीने विचार केला तरी संस्कृताच्या तोडीची दुसरी भाषाच नाही. व्युत्पत्ती शास्त्रानुसार विचार केला तरी, जवळजवळ सर्वच भारतीय भाषा संस्कृतातून निर्माण झालेल्या आहेत. इंग्रजी भाषेतील अनेक शब्द संस्कृतशी साधर्म्य सांगतात. भारतीयांना अभिमान वाटावा अशा या संस्कृत भाषेला संगणकाच्या दृष्टीने देखील खास महत्व आहे. प्राचीन वाङ्मयाचा, महाकाव्याचा, किंवा शास्त्राचा अभ्यास करण्यासाठी संस्कृत भाषेचे ज्ञान असणे आवश्यक मानले जाते. परदेशातील विद्वान, तज्ञ देखील आज संस्कृत जाणण्यासाठी प्रयत्नशील आहेत. संस्कृतमधील पद्यकाव्ये तर मोठ्या प्रमाणावर आहेत. विद्वान, पंडित, रसिकजन त्यातील शब्दसौंदर्य, अर्थालंकार जाणून घेण्याचा अभ्यास करत असतात.

परंतु संस्कृत भाषेतील एक महत्वाचा पैलू म्हणजे सुभाषित संग्रह। सर्वसामान्यांना देखील सहज आकलन होतील अशी ही सुभाषिते प्रसंगानुसार

With Best Compliments From
681/1, Gavhane Ind...

मार्गदर्शन करतात सिद्धांत मांडतात. अनमोल गोष्टींचे सत्कार करतात आणि संकटात धीर देखील देतात.

या नवीन वर्षात म्हणजेच २०२३ मध्ये आपण काही सुपरिचित तर काही अपरिचित श्लोकांविषयी अधिक जाणून घेणार आहोत.. अगदी थोड्या शब्दांत फार मोठा आशय मांडण्याचे काम ही सुभाषित करतात. आणि या सुभाषितांमध्ये विषयांचे वैविध्य तर अफाट आहे. त्यातही सर्वाधिक सुभाषिते ही विद्या किंवा ज्ञानाचे महत्व सांगणारी, सत्संगतीचा लाभ कथन करणारी, दुर्जनांपासून सावधगिरीचा इशारा देणारी, सद्गुण अंगी बाणवण्यासाठी प्रेरणा देणारी अशी असतात. दर महिन्याला आपण वेगवेगळी सुभाषिते अभ्यासणार आहोत आणि त्यांचा अर्थ, त्याचबरोबर त्यातील लक्ष्यार्थ किंवा काही संदेश असेल तर तोही समजावून घेणार आहोत. या सुभाषितांच्या संग्रहाने आपली वैचारिक श्रीमंती तर निश्चितच वाढेल. व्यक्तिमत्वामध्ये सद्गुणांचे संवर्धन होईल. स्मरणशक्ती व आत्मविश्वास ही निश्चित वाढेल.



सुभाषित - सुष्टु भाषितम् । शोभनम् भाषितम् ।
सुवचन । [illegible] भाषितम् ।

जीवनातील मूल्य शिक्षणाचे महत्व अतिशय अल्प शब्दांत आणि उदाहरणासहित पटवून दिल्याने चटकन मनावर ठसते. काही सुभाषिते तर त्यातील अनुप्रास, यमक यांमुळे चटकन मुखोद्गतही होतात. समयोचित प्रसंगी बोलताना वापरली तर त्यामुळे भाषेला प्रौढत्व आणि शब्दांना वजन प्राप्त होते. पाहू या तर मग काही सुभाषिते

With Best Compliments from
▸ गुंठेवारी ▸ एन. ए. ऑर्डर
▸ सरकारी मोजणी ▸ प्रॉपर्टी कन्सल्टंट

सहज, सुलभ सोप्या सुभाषितांपासून प्रारंभ करूया आणि मग पुढे हळू हळू त्यातील सौंदर्य, शब्दचमत्कृती अर्थालंकार जाणून घेत घेत पुढे जाऊ या. अन्योक्ति किंवा कूटप्रश्न किंवा प्रहेलिका यामुळे बुद्धिला चालना मिळते व सुभाषितांची खुमारी आणखी वाढते.

हस्तस्य भूषणं दानं सत्यं कण्ठस्य भूषणम् ।
श्रोत्रस्य भूषणं शास्त्रं भूषणैः किं प्रयोजनम् ॥

द्राक्षा म्लानमुखी जाता शर्करा चाश्मतां गता ।
सुभाषितरसस्याग्रे सुधा भीता दिवं गता ॥

पात्रे त्यागी गुणे रागी संविभागी च बन्धुषु ।
शास्त्रे बोद्धा रणे योद्धा स वै पुरुष उच्यते ।

मूलं भुजङ्गैः शिखरं प्लवङ्गैः
शाखा विहङ्गैः कुसुमं च भृङ्गैः ।
श्रितं सदा चन्दनपादपस्य
परोपकाराय सतां विभूतयः ।

दुर्जनं प्रियवादीति नैतद् विश्वासकारणम् ।
मधु तिष्ठति जिह्वाग्रे हृदये तु हलाहलम् ॥

© www.madhaveeagnuveer.com